# दि कल्याण जनता सहकारी बँक लि. (मल्टीस्टेट शेडयुल्ड बँक)
## ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

रविवार, दि. २९.०७.२०१८ रोजी बँकेची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नवरंग बँक्वेट हॉल, फोर्टीस हॉस्पिटलजवळ, बैलबाजार, कल्याण (प.) येथे सकाळी १०.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

ठीक सकाळी १०.०० वाजता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी जाहीर केले की, सभेस आवश्यक ती गणसंख्या नसल्याने सभा अर्धा तास तहकुब केली जात आहे. सदर सभा अर्ध्या तासानंतर म्हणजे ठीक १०.३० वाजता भरेल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही. त्यानंतर ठीक सकाळी १०.३० वाजता सभेच्या कामकाजास सुरुवात झाली. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अतुल खिरवडकर यांनी सर्व उपस्थितांचे हार्दिक स्वागत करुन सभेची सूचना वाचून दाखविली. तसेच अहवालातील मुद्रणदोष सांगितले.

सभेच्या सुरुवातीस मा. अध्यक्ष ॲड. श्री. सुरेश पटवर्धन यांनी सर्व सभासदांचे स्वागत केले व दुखवटयाचा ठराव मांडण्याची विनंती बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. मधुसूदन पाटील यांना केली.

यानंतर बँकेचे उपाध्यक्ष मा. श्री. मधुसूदन पाटील यांनी अहवाल सालात देवाज्ञा झालेल्या मान्यवर व्यक्ती व सभासद यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सूचित केले व सर्वांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहण्याची विनंती केली.

**ठराव क्र. १ : दुखवटयाचा ठराव -**

अहवाल सालात ज्या मान्यवरांचे व सभासदांचे निधन झाले त्यांना दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून ही सभा श्रध्दांजली वाहत आहे.

महाराष्ट्र राज्याचे कृषीमंत्री - पांडुरंग फुंडकर, विधान परिषदेचे माजी सभापती - प्रा. ना. स. फरांदे, विधान परिषदेचे माजी उपसभापती - वसंत डावखरे, पालघर जिल्ह्याचे खासदार - ॲड. चिंतामण वनगा, महाराष्ट्राचे माजी मंत्री व कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते - पतंगराव कदम, समाजवादी नेत्या, माजी आमदार - कमल देसाई, ज्येष्ठ समाजवादी नेते - भाई वैद्य, माजी नौदल प्रमुख - जयंत नाडकर्णी, महाराष्ट्र राज्याचे माजी आर्थिक सल्लागार व अर्थतज्ज्ञ - दत्तात्रेय पेंडसे, IRB चे संस्थापक, ख्यातनाम उद्योजक - दत्तात्रय म्हैसकर, सॅटरडे क्लबचे संस्थापक - माधवराव भिडे, श्री कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्य जगद्गुरु जयेंद्र सरस्वती, अभिनेत्री - शकिला, ज्येष्ठ साहित्यिक व पत्रकार - अरुण साधु, लेखक व पत्रकार - ह. मो. मराठे, ज्येष्ठ अभिनेत्री - श्यामा, ग्वाल्हेर घराण्याचे ज्येष्ठ गायक - पं. नारायण बोडस, ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक - शशी कपूर, सुप्रसिध्द संतुरवादक - पं. उल्हास बापट, लेखिका, दिग्दर्शिका, बालरंगभूमीच्या प्रवर्तिका - सुधा करमरकर, ज्येष्ठ पत्रकार व लेखक - मुझफ्फर हुसेन, प्रख्यात अभिनेत्री - श्रीदेवी, ज्येष्ठ साहित्यिक व लेखक - गंगाधर पानतावणे, जयेष्ठ दिग्दर्शक - दिलिप कोल्हटकर, भावगीत गायक - अरुण दाते, अभिनेते - डॉ. हेमू अधिकारी, अभिनेत्री - रिटा भादुरी, आकाशवाणीवरील वृत्त निवेदिका - सुधा नरवणे, बँकेच्या कोल्हापूर शाखेचे शाखाव्यवस्थापक - राजेंद्र मोहिते, बँकेतील कर्मचारी - अशोक मालुसरे,

कल्याणातील ख्यातनाम वकील - ॲड. शांताराम दातार, कल्याणातील प्रथितयश वास्तुविशारद व बँकेच्या अनेक शाखांची रचना करणारे - प्रभाकर सहस्त्रबुध्दे, आंबेनळी घाटातील अपघातात निधन झालेले दापोली कृषी महाविद्यालयातील कर्मचारी.

## दिवंगत सभासदांची यादी

| क्र. | सभासद क्रमांक | नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| १. | २०३९८ | सरमहाले रामदास भिकू | ०९.०१.२०१७ |
| २. | ३१५५८ | खेडेकर हरिश्चंद्र नारायण | २२.०१.२०१७ |
| ३. | १९६०४ | बडवे मुरलीधर वामन | २६.०१.२०१७ |
| ४. | २९०७४ | दिक्षित सुदिप्ता सुरेश | ३०.०१.२०१७ |
| ५. | ३८७९९ | जळगावकर रविंद्र बाळाराम | ०७.०२.२०१७ |
| ६. | २१७७४ | मराठे मधुकर काशिनाथ | १४.०२.२०१७ |
| ७. | ५३५२२ | नाईक मीरा गोपीनाथ | २०.०२.२०१७ |
| ८. | ३७५५३ | पटवर्धन अकल्पिता माधव | २१.०२.२०१७ |
| ९. | २१७६ | निचिते विजयकुमार शंकर | १३.०३.२०१७ |
| १०. | ३३३३१ | चौधरी प्रविण शिवाजी | १५.०३.२०१७ |
| ११. | १९६६७ | कुलकर्णी लक्ष्मीबाई नारायण | १९.०३.२०१७ |
| १२. | २२७६९ | वाळेकर शंकर कृष्णाजी | ०५.०४.२०१७ |
| १३. | ९७७७ | देशमुख विकास अनंतराव | ०७.०४.२०१७ |
| १४. | १६९२७ | असलेकर माधवी मनोहर | १२.०४.२०१७ |
| १५. | ९९३० | भिडे दिगंबर सोमनाथ | १५.०४.२०१७ |
| १६. | २९२२१ | तांबोळी सुनिता तुकाराम | ०९.०५.२०१७ |
| १७. | ३३६७३ | तामणे मोहन पुरुषोत्तम | १७.०५.२०१७ |
| १८. | ५४३३० | देवस्थळी मंदाकिनी राजाराम | १७.०५.२०१७ |
| १९. | २१६९३ | टिळक गजानन कृष्णाजी | १८.०५.२०१७ |
| २०. | ४१५८ | मुंढे यशवंत श्रीपाद | २८.०५.२०१७ |
| २१. | ४२२१४ | साळी अमर पंडीत | ३०.०५.२०१७ |
| २२. | ९६१८ | जोशी विद्याधर वसंत | ०३.०६.२०१७ |
| २३. | ४५३२८ | कुलकर्णी आत्माराम शंकर | १५.०६.२०१७ |
| २४. | २२२०२ | वंजारी सचिन प्रभाकर | १५.०६.२०१७ |
| २५. | ३६९ | ठोसर कमल विनायक | १६.०६.२०१७ |
| २६. | ४३२५१ | शिसोदिया मनोज जगतवीरसिंह | १८.०६.२०१७ |
| २७. | १७८५२ | उपाध्ये उषा जयप्रकाश | १९.०६.२०१७ |
| २८. | ८५६० | भट चिदम्बर चन्द्राम | २१.०६.२०१७ |
| २९. | १२०७३ | पारेख जितेंद्र पुरुषोत्तम | २१.०६.२०१७ |

| क्र. | सभासद क्रमांक | नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| ३०. | ४२९९७ | अय्यर रामस्वामी रामनाथ | २६.०६.२०१७ |
| ३१. | २४८६ | फुटाणे रमेशचंद्र नारायण | ०९.०७.२०१७ |
| ३२. | ४२६४५ | वैद्य शमिता शशिकांत | १०.०७.२०१७ |
| ३३. | ३७०५३ | जाधव मनोज भिमा | १०.०७.२०१७ |
| ३४. | २०८२२ | आठवले विजया केशव | १३.०७.२०१७ |
| ३५. | ३७१५ | शर्मा रामप्रकाश बसंतराम | २०.०७.२०१७ |
| ३६. | २९५९ | नामजोशी मृणालिनी मनोहर | २०.०७.२०१७ |
| ३७. | ६६७७ | यादगिरे कृष्णराव नारायणराव | २१.०७.२०१७ |
| ३८. | ५३५०६ | कुलकर्णी मधुकर जगन्नाथ | २७.०७.२०१७ |
| ३९. | ८६८१ | चौधरी रामा दौलत | २८.०७.२०१७ |
| ४०. | ५४६८६ | देशपांडे रामचंद्र दत्तात्रय | ३१.०७.२०१७ |
| ४१. | ११०४२ | मसीह जॉर्ज चरण | ०६.०८.२०१७ |
| ४२. | ११६५२ | परांजपे प्रकाश वसंत | १२.०८.२०१७ |
| ४३. | ४४६८७ | प्रजापती ललिता विश्राम | १३.०८.२०१७ |
| ४४. | ४३४३० | माटे मंगला गणेश | १३.०८.२०१७ |
| ४५. | ११२४७ | फाटक राधिका श्याम | १३.०८.२०१७ |
| ४६. | ३०४५९ | चव्हाण सुधाकर दत्तू | १३.०८.२०१७ |
| ४७. | ३१४९४ | पारख स्मिता सोहनलाल | १४.०८.२०१७ |
| ४८. | २२६५१ | बेटावदकर प्रभाकर हरिदास | १४.०८.२०१७ |
| ४९. | ४७१२० | चन्ने वासुदेव चिंधुजी | २४.०८.२०१७ |
| ५०. | ४४६६ | चौधरी केशव दत्तात्रय | २६.०८.२०१७ |
| ५१. | ५१७२५ | हजारे तारा लक्ष्मण | ३१.०८.२०१७ |
| ५२. | ३५४४५ | खंडागळे दत्तात्रय पालो | ३१.०८.२०१७ |
| ५३. | ४४८९१ | यादव सुदामाप्रसाद गरज | ०१.०९.२०१७ |
| ५४. | १९८८० | येंधे वसंत गणपत | ०३.०९.२०१७ |
| ५५. | ५२३९९ | अहुजा तिरथराम अमीरचंद | ०३.०९.२०१७ |
| ५६. | ४७१३६ | ओक शालिनी वसंत | ०४.०९.२०१७ |
| ५७. | ५७५५ | पळणिटकर श्रीकांत मुकुंद | ०४.०९.२०१७ |
| ५८. | १५०५७ | मढवी शालिक हरि | ०६.०९.२०१७ |
| ५९. | ५४५२ | शुक्ला शशिकला श्रीकृष्ण | १५.०९.२०१७ |
| ६०. | १४४४६ | धनगर सुधीर श्रावण | २४.०९.२०१७ |
| ६१. | ६०४०३ | केंद्रे श्रावण व्यंकटराव | २१.०१.२०१७ |
| ६२. | ५३८२३ | बोरसे लता मधुकर | ०१.१०.२०१७ |
| ६३. | १८६९५ | गद्रे विमल शंकर | ०१.१०.२०१७ |

| क्र. | सभासद क्रमांक | नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| ६४. | ४०३९७ | नाईक व्यंकटेश गोपाळ | ०६.१०.२०१७ |
| ६५. | २२२४० | थोरात सुभाष विष्णू | ०८.१०.२०१७ |
| ६६. | १२५१३ | गुप्ते सुधाकर नारायण | ०९.१०.२०१७ |
| ६७. | २४०३१ | पाटील कृष्णा नरसु | १६.१०.२०१७ |
| ६८. | २५१७८ | शेलार राम काशिराम | १९.१०.२०१७ |
| ६९. | ४३१४१ | भाटीया पुरुषोत्तमदास तुलसीदास | २३.१०.२०१७ |
| ७०. | ५९७०४ | नाटेकर सतिश भिवा | २६.१०.२०१७ |
| ७१. | २२६६० | पुराणिक कुसूम रमेश | २९.१०.२०१७ |
| ७२. | १९८८६ | भोळे उषा शंकर | ३०.१०.२०१७ |
| ७३. | ३८८८८ | जोशी सिन्धू एकनाथ | ०३.११.२०१७ |
| ७४. | ३०३०५ | उपासनी अशोक दिगंबर | ०६.११.२०१७ |
| ७५. | १०२०२ | कदम मनोहर राजाराम | ०७.११.२०१७ |
| ७६. | २०५२५ | मोने सुनंदा शरद | ०७.११.२०१७ |
| ७७. | ४७०५७ | तांबवेकर लक्ष्मण नारायण | ०८.११.२०१७ |
| ७८. | ३३८५८ | नांद्रे अवकाश रामदास | ०८.११.२०१७ |
| ७९. | ३४३० | काणे अनंत दामोदर | ०९.११.२०१७ |
| ८०. | ३०८३२ | नगिनाराम रामकेवल राम | १०.११.२०१७ |
| ८१. | ३४५१५ | पाटील हरीश्चंद्र विष्णु | ११.११.२०१७ |
| ८२. | ७०२ | साठे अनुराधा रमेश | ११.११.२०१७ |
| ८३. | २००५४ | जोशी दिगंबर मोरेश्वर | २०.११.२०१७ |
| ८४. | ३३९१९ | रॉड्रिक्स हिलरियन फेलिक्स | २१.११.२०१७ |
| ८५. | १३३०२ | फाटक अशोक यशवंत | २२.११.२०१७ |
| ८६. | ८७३८ | चौधरी नलिनी पंडीत | २३.११.२०१७ |
| ८७. | १२६५३ | पठाण चंदुलाल बन्नुभाई | ०१.१२.२०१७ |
| ८८. | २१५३४ | पिंगळे माधव वासुदेव | ०१.१२.२०१७ |
| ८९. | ४३१४२ | भाटीया जेठानंद तुलसीदास | ०४.१२.२०१७ |
| ९०. | ४५५७ | परांजपे वसंत आत्माराम | ०६.१२.२०१७ |
| ९१. | १२४६३ | उघडे भागाजी धाकल्या | ०९.१२.२०१७ |
| ९२. | २३६३८ | चव्हाण प्रशांत सुधाकर | १५.१२.२०१७ |
| ९३. | ४३१५७ | मिश्रा जयराज सावळाप्रसाद | २१.१२.२०१७ |
| ९४. | २२७२५ | देशपांडे प्रमिला प्रभाकर | २८.१२.२०१७ |
| ९५. | ७९४८ | चिटणीस उषा विलास | ०२.०१.२०१८ |
| ९६. | ६३७१३ | कुलकर्णी अमोल अच्युत | ११.०१.२०१८ |
| ९७. | ६१३२९ | पांडा डाकेस्वर खली | १२.०१.२०१८ |

| क्र. | सभासद क्रमांक | नाव | मृत्यू दिनांक |
|---|---|---|---|
| ९८. | ९७२० | पोखरकर अर्जुन देवराम | १३.०१.२०१८ |
| ९९. | ५२३०४ | लभडे विष्णू राजाराम | २३.०१.२०१८ |
| १००. | ४६८५० | थालिया कुवरसिंग रघुनंदन | २७.०१.२०१८ |
| १०१. | ३२३६१ | तिवारी बाबूराम सत्यनारायण | ०४.०२.२०१८ |
| १०२. | ८६१५ | नांदगांवकर मुरलीधर दामोदर | ०७.०२.२०१८ |
| १०३. | ४३१६३ | तोंडलीकर निर्मला बळीराम | ०८.०२.२०१८ |
| १०४. | २७०२५ | थोरात रावसाहेब नाना | १४.०२.२०१८ |
| १०५. | ४२६२० | राखाडे सदानंद दगडु | १५.०२.२०१८ |
| १०६. | ५४१२९ | पाटणकर वसंत वासुदेव | १६.०२.२०१८ |
| १०७. | १९७०० | वाघ किसनराव काशिनाथ | १९.०२.२०१८ |
| १०८. | ३२७९६ | मढवी चिना शिवा | २३.०२.२०१८ |
| १०९. | १९९८१ | लोखंडे अर्चना अनंत | ०३.०३.२०१८ |
| ११०. | २२६१९ | कुलकर्णी मंगला पांडुरंग | ०५.०३.२०१८ |
| १११. | ६६४१ | पोळ चंद्रकांत गणपतराव | ०९.०३.२०१८ |
| ११२. | ४७६२९ | सनान्से सुभाष नारायण | ११.०३.२०१८ |
| ११३. | ३९७७२ | शेख शब्बीर यासिन | १२.०३.२०१८ |
| ११४. | २५२६४ | जाधव सुरेश फकिरा | १९.०३.२०१८ |
| ११५. | ५३२० | माने अशोक मुरलीधर | २१.०३.२०१८ |
| ११६. | ५५८१८ | शेख सईदा महंमद हयात | २५.०३.२०१८ |
| ११७. | ३१९३० | जाधव रविंद्र गोविंद | ०६.०४.२०१८ |
| ११८. | १५४६० | महिंद्रकर मनोरमा नारायण | २०.०४.२०१८ |
| ११९. | १२५७१ | भडके भाऊसाहेब गेनू | २९.०४.२०१८ |
| १२०. | ११८८२ | वढावकर सुरेखा शिवाजी | ०२.०५.२०१८ |
| १२१. | १९०६७ | खिसमतराव मंगला केशव | १३.०५.२०१८ |
| १२२. | २०२९९ | एकबोटे रत्नाकर श्रीपाद | १३.०५.२०१८ |
| १२३. | ३४२७५ | माळी नामदेव मन्साराम | १७.०५.२०१८ |
| १२४. | २५१२ | भोयर गंगाधर रामभाऊ | ०१.०६.२०१८ |
| १२५. | ४८४७७ | कारळकर जगन्नाथ मारुती | ०५.०३.२०१८ |
| १२६. | ५६११२ | जोशी सुरेश भालचंद्र | २०.०२.२०१८ |
| १२७. | १९५३ | धमेले चंद्रकांत महादेव | ०२.०६.२०१८ |
| १२८. | ५३११६ | मोहिते दिलीप रामदास | १२.०२.२०१८ |
| १२९. | १६६९४ | बाकलीवाल विद्या जयकुमार | ०५.०५.२०१८ |

यानंतर बँकेचे अध्यक्ष मा. ॲड. सुरेश पटवर्धन यांनी दि. ३१.०३.२०१८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल व बँकेच्या वाटचालीचा आढावा दृक्श्राव्य माध्यमातून सभेपुढे सादर करण्यास सुरुवात केली.

अहवाल सादर करण्यापूर्वी श्री. अरुण शिंपी यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस त्यांना मिळाली नसल्याचे सांगितले. तसेच इतिवृत्त वाचून मंजूर करणे व आयत्या वेळचे विषय हे दोन विषय विषयपत्रिकेत का समाविष्ट नाहीत याबाबत आग्रह धरण्याचा प्रयत्न केला. मा. अध्यक्ष ॲड. सुरेश पटवर्धन यांनी सभासदांना जागेवर बसण्याचे आवाहन केले व त्यांचा विषय मांडून झाल्यावर सभासदांनी प्रश्न विचारावेत असे सांगितले. यावेळी अनेक सभासदांनी मा. अध्यक्षांना पाठिंबा देत सभेचा वेळ वाया घालवू नये असे सुचविले.

त्यानंतर दृक्श्राव्य माध्यमातून मा. अध्यक्षांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा सभेसमोर सादर केला.

**विषय : संचालक मंडळाने सादर केलेल्या दि. ३१.०३.२०१८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या अहवालाची नोंद घेणे. तसेच सन २०१८-१९ च्या अंदाजपत्रकाची नोंद घेणे.**

मार्च, २०१८ अखेर बँकेचा एकत्रित व्यवसाय ₹ ४८४१ कोटींचे वर झाला असल्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले. तसेच सन २०१९ पर्यंत एकत्रित व्यवसाय ₹ ५००० कोटींपेक्षा जास्त करण्याचे बँकेचे उद्दिष्ट असून, त्यादिशेने बँकेची वाटचाल सुरु असल्याचे सांगितले. त्यानंतर दृक्श्राव्य माध्यमातून मा. अध्यक्षांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा सभेसमोर सादर केला.

सन २०१६-१७ मध्ये भागभांडवल ₹ ७०.११ कोटी होते. त्यात ₹ ६.१३ कोटींची वाढ होऊन सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात बँकेचे भागभांडवल ₹ ७६.२५ कोटी इतके झाले आहे. ८.७५ % ने भागभांडवल वाढले आहे. राखीव निधी ₹ १४८.०५ कोटींवरुन ₹ १८०.५२ कोटी झाले आहेत. राखीव निधीत २१.९३% नी वाढ झाली आहे. २०१६-१७ मध्ये सभासद संख्या ५३६५५ एवढी होती. २०१७-१८ मध्ये सभासद संख्या १४९८ ने वाढून ५५१५३ झाली आहे.

बँकेच्या एकूण ठेवी २०१६-१७ या आर्थिक वर्षाखेरीस ₹ २६७२.४१ कोटी होत्या. त्यामध्ये वाढ होऊन २०१७-१८ आर्थिक वर्षअखेर ₹ २८१४.०२ कोटी इतक्या झाल्या आहेत. ठेवींमध्ये ५.३०% वाढ झालेली आहे. बँकेची एकूण कर्जे २०१६-१७ अखेर ₹ १८७५.७८ कोटी होती. त्यामध्ये वाढ होऊन २०१७-१८ अखेर एकूण कर्जे ₹ २०२६.६२ कोटी इतकी झाली आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत कर्जांमध्ये ८.०४% इतकी वाढ झाली आहे.

बँकेचा निव्वळ नफा सन २०१६-१७ साली ₹ २०.०२ कोटी होता, सन २०१७-१८ यावर्षी निव्वळ नफा ₹ २०.२९ कोटी इतका झालेला आहे. नफ्यामध्ये १.३५ % वाढ झालेली आहे.

सन २०१६-१७ साली प्रती कर्मचारी उत्पादकता ₹ ८.६५ कोटी होती त्यामध्ये वाढ होऊन यावर्षी ती ₹ ९.०६ कोटी इतकी झाली आहे.

रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार भांडवल पर्याप्तता (Capital Adequacy) प्रमाण ९% पेक्षा अधिक असले पाहिजे. बँकेने २०१७-१८ अखेर भांडवल पर्याप्तता प्रमाण १२.१६% इतके राखलेले आहे.

सन २०१६-१७ मध्ये बँकेच्या ढोबळ अनुत्पादित कर्जाचे (Gross NPA) प्रमाण ४.१३% पर्यंत होते. तर निव्वळ अनुत्पादित कर्जे (Net NPA) २.४१% होती. ढोबळ व निव्वळ अनुत्पादित कर्जाचे प्रमाण ह्यावर्षी अनुक्रमे ५.७१% व ३.७७% एवढे आहे.

आपल्या बँकेचा एकत्रित व्यवसाय (Mix Business) जर बघितला, तर तो २०१३-१४ ला ₹ २७१० कोटी झाला. २०१४-१५ ला ₹ ३२४३ कोटी, २०१५-१६ अखेरीस ₹ ३८८९ कोटी, २०१६-१७ अखेरीस ₹ ४५४८ कोटी तर २०१७-१८ अखेरीस ₹ ४८४१ कोटी इतका झालेला आहे.

लेखापरीक्षण व तपासणी याबाबत माहिती देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की, मे. किर्तने अँड पंडीत, एल. एल. पी यांनी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता बँकेस 'अ' वर्ग दिला आहे.

तंत्रज्ञान विभागाबाबत माहिती देतांना मा. अध्यक्षांनी सांगितले की, बँकेने रिटेल व कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग सोबतच मोबाईल बँकिंग व UPI (BHIM ॲप) सेवा सुरु केली आहे. ज्यास ग्राहकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.

यावर्षी बँक आपल्या विविध शाखांमध्ये अतिरिक्त ५ Cash Depositary Machine व Passbook Printing Machine स्थापित करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्याचप्रमाणे बँकेने ग्राहकांना आकर्षक वैशिष्टये असलेले RuPay प्लॅटिनम डेबिट कार्ड ग्राहकांना उपलब्ध करुन दिले आहे. ह्या कार्डद्वारे ATM, POS आणि E-Com च्या सुविधा उपलब्ध आहेतच. परंतु त्याचबरोबर प्लॅटिनम डेबिट कार्ड होल्डरला ₹ २.०० लाखाचे अपघाती मृत्यु विमा संरक्षण उपलब्ध आहे. डेबिट कार्ड जर अपघात होण्याआधी ४५ दिवसांमध्ये यशस्वीरीत्या वापरण्यात आले असेल तर NPCI च्या डेबिट कार्ड अपघात विमा योजनेअंतर्गत ₹ २.०० लाख विमा रक्कम मिळण्यास पात्र राहील. NPCI च्या डेबिट कार्ड अपघात विमा योजनेअंतर्गत आपल्या ग्राहकांनी दाखल केलेल्या दाव्यापोटीची रक्कम त्यांना अदा करण्यात आली आहे.

बँक आजपासून ग्राहकांना Missed Call Alert Service उपलब्ध करुन देत आहे. सदर सेवेमार्फत ग्राहक आपल्या नोंदणीकृत मोबाईलद्वारे ०२२६१८१६०८१ ह्या नंबरवर फक्त एका Missed Call ने खात्यातील शिल्लक रकमेची माहिती प्राप्त करु शकतात. त्याचप्रमाणे ATM Card हरवल्यास आपल्या नोंदणीकृत मोबाईलद्वारे ०२२६१८१६०५५ ह्या नंबरवर फक्त एका Missed Call ने ATM Card ब्लॉक करु शकता.

बँकिंग सेवेव्यतिरिक्तही अन्य काही सेवा आपली बँक ग्राहकांना देत आहे. त्यापैकी एक म्हणजे Franking सेवा, ही काळातलाव शाखेमार्फत दिली जाते. अहवाल सालात ८०,६८१ दस्तऐवज नोंदवले असून त्यापोटी बँकेस ₹ ७.६८ लाख इतके उत्पन्न मिळाले आहे.

बँक २०११ पासून कोटक लाईफ इन्शुरन्स व २०१४ पासून दि न्यु इंडिया ॲश्युरन्स कं. या भारतातल्या सर्वात मोठया सर्वसाधारण विमा कंपनीचे कॉर्पोरेट एजंट म्हणून कार्यरत आहे. विम्याच्या या दोन्ही क्षेत्रामध्ये बँकेने सातत्याने व्यवसाय वृध्दी नोंदविलेली आहे. जीवन विम्यापोटी ७४९ विमा पॉलिसींतून ₹ २०५.०४ लाख रकमेचे विमा हप्ते आणि इतर सर्वसाधारण विम्यापोटी ११३७ पॉलिसींतून ₹ ८२.७८ लाख इतकी विमा प्रिमियम रक्कम

बँकेने अहवाल वर्षात जमा केली आहे. या दोन्ही प्रकारच्या विमा व्यवसायातून बँकेने ₹ ८३.०६ लाख इतकी रक्कम कमिशनपोटी मिळविली.

त्याचप्रमाणे भारत सरकारतर्फे सुरु करण्यात आलेल्या प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेअंतर्गत व प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजनेअंतर्गत खातेदारांनी मोठया प्रमाणात या योजनेचा लाभ घेतला आहे. प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजनेचा लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियामार्फत ४८६१ खातेदारांनी लाभ घेतला. त्यापोटी ₹ १६,०४,१३०/- विमा हप्ता रक्कम भरली आहे. तसेच प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेचा न्यू इंडिया अॅश्युरन्स कंपनीमार्फत १०३६२ खातेदारांनी लाभ घेतला त्यापोटी ₹ १,२४,३४४/- विमा हप्ता रक्कम भरण्यात आली आहे.

**पुरस्कार :** यानंतर अहवाल वर्षात बँकेला जे विविध पुरस्कार मिळाले त्याबद्दलची माहिती मा. अध्यक्षांनी सभेस दिली.

१) **"बँकिंग फ्रंटियर" या ख्यातनाम मासिकातर्फे** बँकेस "Best Chairman Award" हा पुरस्कार प्राप्त झाला.
२) **दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप बँक्स् फेडरेशन** यांचेतर्फे ₹ १००० कोटींचे वर ते ₹ ३००० कोटीपर्यंत ठेवी असलेल्या बँकाच्या गटात बँकेस 'सर्वोत्कृष्ट बँक' हा तृतीय क्रमांकाचा पुरस्कार दि. १९ सप्टेंबर, २०१७ रोजी प्राप्त झाला.
३) **"बँको" या मासिकातर्फे** मोठया सहकारी बँकांच्या गटात बँकेस सन २०१६-१७ करिता 'सर्वोत्कृष्ट बँक' (पहिले बक्षीस) हा पुरस्कार सलग चौथ्या वर्षी आणि Best Technology' (पहिले बक्षीस) हा पुरस्कार सलग दुसऱ्या वर्षी हे दोन पुरस्कार दि. १९ जानेवारी, २०१८ रोजी प्राप्त झाले.

यानंतर आपल्या बँकेच्या ४२ व्या 'भिवंडी शाखेचे उद्घाटन' दि. ०६ सप्टेंबर, २०१७ रोजी झाले, 'वाडा शाखेचे स्थलांतरण' दि. १८ जानेवारी, २०१८ रोजी झाले, ह्याबाबत माहिती मा. अध्यक्षांनी दिली. तसेच 'केंद्रीय अर्थसंकल्पावरील व्याख्यान', 'विद्यार्थी प्राविण्य पुरस्कार', 'धर्मादाय निधी वितरण' व 'RuPay प्लॅटिनम डेबिट कार्ड' हे विशेष उपक्रम राबविले, त्याबाबतची माहिती मा. अध्यक्षांनी सभेस दिली. तसेच नागालँडचे राज्यपाल मा. श्री. पद्मनाभजी आचार्य यांनी दि. २७ जून, २०१८ रोजी मुख्य कार्यालयास सदिच्छा भेट याची माहिती मा. अध्यक्षांनी सभेस दिली.

सन २०१८-१९ या वर्षाचा व्यवसायाचा अंदाजपत्रक सादर करतांना त्यांनी सांगितले की ठेवी ₹ ३,१०० कोटी व कर्जे ₹ २,२०० कोटी व नफा ₹ २१ कोटी होईल, असा अंदाज आहे. त्यामुळे आपला एकत्रित व्यवसाय ₹ ५००० कोटींच्या वर होणे, अपेक्षित आहे.

सांघिकरित्या बँकेला वैभव शिखरावर नेणे हेच बँकेचे ध्येय आहे. गेली ४५ वर्षे बँक याच ध्येयाने कार्यरत आहे व यापुढेही याच ध्येयाने आपण कार्यरत राहू असा विश्वास मा. अध्यक्षांनी व्यक्त केला. बँकेच्या कामामध्ये सर्व सभासदांचा सहभाग आम्हांला हवा आहे, असे त्यांनी नमूद केले. सर्व सभासदांना धन्यवाद देऊन दृकश्राव्य माध्यमातील अध्यक्षीय भाषण संपवले.

**ठराव क्र. २ :** संचालक मंडळाने सादर केलेल्या दि. ३१.०३.२०१८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल **मा. अध्यक्ष ॲड. सुरेश पटवर्धन** यांनी सभेपुढे वाचून दाखविला. त्याचबरोबर पुढील वर्षाचे अंदाजपत्रक व नवीन व्यावसायिक उद्दिष्टे सभेपुढे मांडली. त्याची ही सर्वसाधारण सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. योगेश माळी | सभासद क्र. ६६३५९ |
| अनुमोदक : | श्री. अशोक कदम | सभासद क्र. ६७२ |

ठराव सर्वानुमते मंजूर.

ठरावासंबंधी प्रश्न उपस्थित करताना सभासद श्री. कुल्लूर यांनी विचारले की, ठरावावर सूचक व अनुमोदक म्हणून ठराविक सभासदांची नावे का घेतात? आधीच त्यांना पढवून ठेवलेले असते का? आमची नावे का घेत नाहीत? गेली अनेक वर्षे मी याबाबत सांगत आहे पण त्याची दखल घेतली जात नाही.

श्री. कुल्लूर यांच्या प्रश्नावर अनेक सभासदांनी आक्षेप घेतला. यावर उत्तर देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की सभासदांना काहीही सांगितलेले नसते. या ठरावाचे सूचक व अनुमोदक सभेत मागे बसले आहेत व बँकेचे कर्मचारी व अधिकारी त्यांच्याकडे जाऊन त्यांची सही घेतात.

श्री. दीक्षित यांनी सूचक, अनुमोदक आहे तर ठराव एकमताने मंजूर झाला असे का सांगत नाही. यावर उत्तर देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की त्यांनी ठराव सर्वानुमते मंजूर झाल्याचे अगोदर सांगितले. कदाचित श्री. दीक्षित यांनी ऐकले नसावे.

तसेच मा. अध्यक्षांनी सर्व सभासदांना असे सांगितले की, श्री. दीक्षित हे गेली ४ वर्षे वार्षिक सर्वसाधारण सभेत, विषय पत्रिकेवरील विषयांवर न बोलतां, कामकाजाशी संबंधित नसलेले विषय उपस्थित करुन असंसदीय भाषा वापरतात असे आढळून आले आहे. तसेच त्यांनी सोशल मिडियामार्फत बँकेचा अपप्रचार केला त्यामुळे श्री. दीक्षित ह्यांचेविरुध्द कल्याण येथील न्यायदंडाधिकारी न्यायालयात मानहानीचा फौजदारी खटला दाखल केला आहे. कोर्टाकडून त्याची सुनावणी सुरु आहे.

श्री. अरुण शिंपी यांनी पुन्हा सभेची नोटीस त्यांना मिळाली नसल्याचे सांगितले व विचारणा केल्यावर समाधानकारक उत्तर मिळत नसल्याचे सांगितले. श्री. शिंपी यांच्या विधानावर अनेक सभासदांनी आक्षेप घेतला. श्री. शिंपी यांनी पुन्हा एकदा इतिवृत्त वाचन व आयत्या वेळचे विषय समाविष्ट का करत नाहीत?

श्री. शिंपी यांच्या प्रश्नाला सभासदांनीच विरोध दर्शविला. प्रश्नाला उत्तर देताना मा. अध्यक्षांनी सांगितले की, मागील वर्षाच्या इतिवृत्तामध्ये याचे स्पष्टीकरण दिलेले आहे. मल्टीस्टेट को-ऑप सोसायटी कायद्यातील तरतुदीनुसार व बँकेने नव्याने पारीत केलेल्या उपविधीनुसार वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजात हे बदल झाले आहेत. त्यामुळे ‘इतिवृत्त वाचून मंजूर करणे’ व ‘आयत्या वेळचे विषय’ हे विषयपत्रिकेत समाविष्ट करण्यात आले नाहीत.

तरीही, श्री. शिंपी सभेत पुन्हा तिच तिच विधान करीत होते. परंतु अन्य सभासदांनी त्यांना जागेवर बसण्यास सांगितले. मा. अध्यक्षांनी सर्व सभासदांना शांतता पाळण्याचे आवाहन केले.

यानंतरचा विषय वैधानिक लेखापरीक्षणासंदर्भात असून तो मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी, मा. संचालक सी. ए. सचिन आंबेकर यांना सांगितले.

**विषय : वैधानिक लेखापरीक्षकांनी तपासलेला दि. ३१.०३.२०१८ रोजीचा ताळेबंद, नफा-तोटा पत्रक आणि लेखापरीक्षण अहवाल स्वीकृत करणे. तसेच मागील वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षणाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.**

यानंतर मा. श्री. आंबेकर यांनी विषय पत्रिकेवरील क्रमांक २ च्या विषयाला दृक्श्राव्य माध्यमातून सुरुवात केली. आपल्या बँकेस दि. २४.०३.२०१७ पासून Multistate Co-operative Societies Act २००२ लागू झाला. दि. ०१.०४.२०१७ ते दि. ३१.०३.२०१८ हे संपूर्ण आर्थिक वर्ष मल्टीस्टेट कायद्यानुसार कामकाज झालेले बँकेचे पहिले आर्थिक वर्ष होय.

दृक्श्राव्य माध्यमातून विषय सादर करताना श्री. आंबेकर यांनी सुरुवातीला भारतातील बँकिंग क्षेत्राची जी परिस्थिती आहे त्याचा थोडक्यात आढावा घेतला.

बँकिंग क्षेत्रात ठेवी व कर्ज वाढीचे प्रमाण कसे होते ते स्पष्ट केले.

दि. ०१.०७.२०१७ पासून नव्याने लागू झालेल्या GST (Goods & Service Tax) टॅक्सचा परिणाम विस्तृतपणे सांगितला. यामध्ये सरकारकडून वारंवार स्पष्टीकरण दिले गेले आणि यामध्ये आता बऱ्यापैकी नियमितता आली आहे. फेब्रुवारी २०१८ मध्ये श्री. नीरव मोदी आणि त्यांच्या कंपन्यांनी पंजाब नॅशनल बँकेमध्ये कोटयावधी रुपयांचा घोटाळा केल्याचे उघडकीस आले आणि पुन्हा एकदा बँकिंग क्षेत्राला मोठा धक्का बसला. त्या पाठोपाठ रोटोमॅक कंपनीतील घोटाळा समोर आला. याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे कर्जावरील व्याजदरात घट झाली. कारण कर्जाची मागणी कमी झाली. कर्जावरील दरात घट झाल्याने ठेवीवरील व्याजदरात कपात करावी लागली. कारण Net Interest Margin वर याचा परिणाम होत असतो.

यावर्षी ठेवींमधील वाढ ही कर्जवाढीच्या तुलनेत कमी होती. कर्जातील वाढ ही सुरुवातीचे सहा महिने ६% होती. वर्षाखेर सदर वाढ ११.५% पर्यंत पोहोचली. तसेच यंदाचे वर्षी बँकिंग क्षेत्रात अनुत्पादित कर्जांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याचे निर्दशनास आले.

याबरोबरच सरकारी रोख्यांच्या बाजारात २०१७-१८ मध्ये मोठया प्रमाणावर घसरण झाली याचा परिणाम बँकेच्या या क्षेत्रातील नफाक्षमतेवर झाला. रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार SLR गुंतवणूक करावी लागते. सरकारी रोख्यात घसरण झाल्याने यातील गुंतवणूकीवर अनेक बँकांना घसाऱ्याची तरतूद करावी लागली आहे. यामुळे काही बँकांना तोटा होण्याची शक्यता आहे.

खाजगी क्षेत्रातील ICICI सारख्या बँकेने अनुत्पादित कर्जांच्या वाढत्या प्रमाणामुळे जून २०१८ रोजी बँकेस तोटा दर्शविला आहे.

२०१६ मध्ये IBC म्हणजे Insolvency and Bankruptcy Code हे कर्जवसुलीसाठी अत्यंत सक्षम असे साधन उपलब्ध झाले आहे. रिझर्व्ह बँकेने काही बँकांना १२ मोठया अनुत्पादित खात्यांबाबत IBC अंतर्गत कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच रिझर्व्ह बँकेने Prompt Corrective Action अशी संकल्पना अस्तित्वात आणली आहे. १२ राष्ट्रीयकृत बँकांवर सध्या रिझर्व्ह बँक Prompt Corrective Action याच्या अंतर्गत कारवाई करत आहे.

गुंतवणूक घसाऱ्यामुळे अनेक बँकांना तरतूद करावी लागली. त्यापैकी काही बँकांना (प्रकारानुसार) रिझर्व्ह बँकेने सवलत दिली. त्याबाबतचे विस्तृत विवेचन केले. त्यामध्ये आपल्या सारख्या मोठया बँकांचा समावेश नाही. आपल्या बँकेने गुंतवणूकीचे व्यवस्थापन योग्य रितीने केल्यामुळे आपल्या बँकेस मार्च २०१८ व जून २०१८ मध्ये कोणतीही घसारा तरतूद करावी लागली नसल्याचे सांगितले.

यावर्षीच्या ताळेबंद, नफा-तोटा पत्रकात Accounting Standard नुसार दोन बदल करण्यात आले. Accounting Standard १० व ४ मध्ये सदर बदल आहेत. ते बदल श्री. आंबेकर यांनी विस्ताराने सभेपुढे सादर केले.

ग्राहकांना कोणती माहिती बँक उपलब्ध करुन देऊ शकते, कोणती देऊ शकत नाही, याबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने त्यांच्या परिपत्रकात खुलासा केला आहे. त्याची माहिती श्री. आंबेकर यांनी सभासदांना दिली व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या परिपत्रकातील परिच्छेद वाचून दाखवला.

दि. ३१.०३.२०१८ रोजीचा ताळेबंद व नफातोटा पत्रकाचे विस्तृतपणे विवेचन केले.

कर्ज वसुलीसाठी बँक प्रयत्नशील आहे. Arbitration अंतर्गत कर्जवसुली होणार असल्याचे सांगितले. कल्याण व पुणे येथे दोन Arbitrator ची नेमणूक करण्यात आली आहे. आत्तापर्यंत ८६ दाव्यांची सुनावणी सुरु झाली असल्याचे सांगितले. SARFAESI अंतर्गतही बँकेने ५८ जणांना नोटीस दिली आहे व वसुली प्रक्रिया सुरु केल्याचे सांगितले.

कायद्याच्या चौकटीत राहूनच कर्जवसुली केली जाईल. ARC म्हणजे Asset Reconstruction Company यांना ७ कर्जखाती दिली आहेत. रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार आवश्यक ती सर्व कार्यवाही केली आहे.

मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटीज कायदा २००२ अंतर्गत आपली बँक येत असल्याने, या वर्षी कर्जवसुलीसाठी ARC माध्यमाचा उपयोग केला.

ARC म्हणजे काय? आणि त्याचे कामकाज कसे चालते याबाबतचा खुलासा श्री. आंबेकर यांनी सभासदांना केला. तसेच आपण ARC कडे दिलेल्या खात्यांमध्ये कशा प्रकारचा व्यवहार करण्यात आला ते सांगितले.

मे. किर्तने अँड पंडीत एल्. एल्. पी. यांनी २०१७-१८ चा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल सादर केला आहे. त्यानुसार बँकेने रिझर्व्ह बँकेची परिपत्रके व अन्य कायद्याचे मापदंडानुसार नियमांची पूर्तता केली असल्याचे सांगितले. बँकेने EDP Audit, System Audit करुन घेतले आहे. निर्लेखित केलेली खाती तपासून त्याबाबतचे सर्टिफिकेट वैधानिक लेक्षापरीक्षकांनी दिले आहे.

तसेच लेखापरीक्षण अहवालातील काही मुद्दे उदा. RC Book उपलब्ध नसणे, नूतनीकरण केलेल्या मालमत्तेचा विमा, वाहनांचा विमा उपलब्ध नसणे, नूतनीकरण केलेल्या मालमत्तेचा विमा, वाहनांचा विमा उपलब्ध नसणे अशा काही मुद्दयांबाबत योग्य खुलासा मा. श्री. आंबेकर यांनी केला.

अहवालात नमूद केलेल्या बाबींचा Compliance Report बहुराज्यीय कायद्यानुसार वैधानिक लेखापरीक्षकांना सादर करण्यात येईल व नंतर Multistate Co-operative Registrar Delhi यांना सादर करण्यात येईल असे सांगितले.

मे. किर्तने अँड पंडीत एल्. एल्. पी यांनी मागील वर्षीचा म्हणजे २०१६-१७ च्या अहवालाचा दोषदुरुस्ती अहवाल दिलेल्या वेळेत सादर केला आहे. सन २०१६-१७ चा वैधानिक लेखापरीक्षण अहवाल दि. ०४.०८.२०१७ रोजी बँकेस प्राप्त झाला. त्याचा दोषदुरुस्ती अहवाल दि. २९.१०.२०१७ रोजी वैधानिक लेखापरीक्षकांकडे सादर केला. सदर दोषदुरुस्ती अहवाल त्यांच्याकडून तपासून झाल्यावर दि. १६.०१.२०१८ रोजी Multistate Co-operative Registrar Delhi यांचेकडे पाठविण्यात आला.

या विषयाबाबतची सर्व आवश्यक माहिती सभासदांना दिल्यामुळे श्री. आंबेकर यांनी मा. अध्यक्षांना ठराव मांडण्याची विनंती केली.

यानंतर मा. अध्यक्षांनी विषयासंदर्भातील ठराव सभेपुढे मांडला.

**ठराव क्र. ३** : वैधानिक लेखापरीक्षक मे. किर्तने अँड पंडीत एल. एल. पी यांनी दि. ३१.०३.२०१८ रोजीचा तपासलेला ताळेबंद, नफातोटा पत्रक आणि लेखापरीक्षण अहवाल **मा. संचालक सी. ए. सचिन आंबेकर** यांनी सभेपुढे मांडला व समजावून सांगितला त्यास ही सभा स्वीकृत करीत आहे. तसेच मागील वर्षाचा वैधानिक लेखापरीक्षणाचा दोषदुरुस्ती अहवाल **मा. संचालक सी. ए. सचिन आंबेकर** यांनी सभेपुढे सादर केला. त्याची ही सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. श्रीराम बाळकृष्ण अभ्यंकर | सभासद क्र. ९३५० |
| अनुमोदक : | श्री. राजेंद्र कृष्णाजी बदले | सभासद क्र. ४६५८२ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

हा ठराव मांडल्यानंतर मा. अध्यक्ष अॅड. श्री. सुरेश पटवर्धन यांनी सांगितले की, सध्या डी. एस्. कुलकर्णी व त्यांना दिलेली कर्जे हा चर्चेचा विषय आहे. आपल्या बँकेनेही डी. एस्. कुलकर्णी व त्यांच्या असोसिएट्स कंपन्यांना कर्ज दिले आहे. याबाबत काही सभासदांनी श्री. डी.एस्. कुलकर्णी यांना बँकेने ₹ १०० कोटींचे कर्ज दिले आहे असे विधान केले असल्याचे सांगितले. यावर मा. अध्यक्षांनी सांगितले की सध्यातरी आपली बँक एका कर्जदाराला इतक्या रकमेचे कर्ज देऊ शकत नाही.

परंतु डी. एस्. कुलकर्णी यांना दिलेले कर्ज व त्यातील सध्याची स्थिती याबाबत माहिती देण्याची विनंती बँकेचे संचालक मा. डॉ. श्री. वसंत काणे यांना केली.

आपल्या विवेचनाच्या सुरुवातीस मा. संचालक, डॉ. काणे सर यांनी स्पष्ट केले की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या गोपनीयता संदर्भात जे परिपत्रक आहे त्याचे कुठल्याही प्रकारे उल्लघंन न होता डी. एस्. कुलकर्णी आणि त्यांच्या कंपनींना जी कर्जे बँकेने वितरीत केली आहेत त्याबद्दलची माहिती ते सभासदांना देणार आहेत.

सध्या वर्तमान पत्रातून डी. एस्. कुलकर्णी यांना दिलेली कर्जे हा चर्चेचा विषय आहे. अनेक बँकांकडून त्यांनी कर्जे घेतली आहेत. सध्या त्यांनी घेतलेली कर्जे ही थकीत कर्जे आहेत अशा व्यक्तींना बँकेने कर्ज कसे दिले असा प्रश्न सभासदांच्या मनात उत्पन्न होणे स्वाभाविक आहे. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाचा आदेश आणि रिझर्व्ह बँकेचे परिपत्रक यास बाधा न येता डी. एस्. कुलकर्णी आणि त्यांच्या कंपन्यांना दिलेल्या कर्जाची माहिती सभेस देत आहे.

आपल्या निवेदनात डॉ. काणे सर यांनी सांगितले की, डी. एस्. कुलकर्णी यांना बँकेने २००२ सालापासून कर्जे दिली आहेत. जानेवारी २०१७ पर्यंत त्यांना विविध प्रकारची कर्जे दिली आहेत. त्यांच्या कर्जांची परतफेड नियमित होती.

दि. ३१.०३.२०१७ रोजी डी. एस्. कुलकर्णी यांना दिलेली कर्जे नियमित होती. सन २०१७-१८ मध्ये कर्जाची परतफेड नियमित झाली नाही. इतर बँकांमध्येही याच कालावधीत कर्जाची परतफेड नियमित होत नव्हती. नंतर ठेवीदारांनी त्यांच्याविरुध्द तक्रार नोंदवली. त्यांची चौकशीही करण्यात आली. आपल्या बँकेसही EOW यांच्याकडून या कर्जखातेसंदर्भात पत्र आले होते व माहिती मागविली होती. ती आपण त्यांना सादर केली आहे.

कर्जखाते थकीत झाल्यावर बँकेने वसुलीची कारवाई सुरु केली होती. ज्या कारणासाठी त्यांना कर्ज मंजूर केले होते ते त्याच कारणासाठी वापरण्यात आले होते याची शहनिशा बँकेने करुन घेतली. या कर्जखात्यांच्या संदर्भात कोणत्याही लेखापरीक्षण अहवालात कोणत्याही गंभीर त्रुटी आढळून आल्या नव्हत्या.

डी. एस्. कुलकर्णी यांना कर्ज देताना सर्व नियमांचे पालन केले होते. त्यांची तारण म्हणून घेतलेली मालमत्ता ही पुण्यातील मध्यवर्ती भागातील वास्तू असून त्याची किंमत कर्जापेक्षा कितीतरी जास्त आहे. ही मालमत्ता फक्त आपल्या बँकेच्या कर्जासच तारण म्हणून दिली आहे. तारण मालमत्तेस भेट देऊन अहवाल दफ्तरी ठेवले आहेत.

डी. एस्. कुलकर्णी यांना दिलेली कर्जखाती आपण Asset Reconstruction Company ला दि. २०.०३.२०१८ रोजी विक्री केली आहे. आजमितीस डी. एस्. कुलकर्णी यांचे कर्जखाती काहीही शिल्लक नाही.

काही सभासदांनी तारण मालमत्ता कोणती व मालमत्तेची बाजार किंमत किती याबद्दल माहिती दयावी असा आग्रह धरला. यास उत्तर देताना मा. डॉ. काणे सर यांनी सांगितले की, सुप्रिम कोर्टाचा निर्णय व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या गोपनीयतेच्या परिपत्रकानुसार हा तपशील देता येणार नाही.

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. आघारकर यांना सांगितले.

**विषय :** **संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०१७-१८ सालच्या नफा वाटणीस मंजुरी देणे.**

मा. ज्येष्ठ संचालक श्री. मोहन आघारकर यांनी २०१७-१८ सालची नफा वाटणी सभेपुढे विस्तृतपणे मांडली. तीव्र स्पर्धा, अनुत्पादित कर्जांमधील वाढ या पार्श्वभूमीवर देखिल आपल्या बँकेने नफा मिळविण्यात सातत्य राखले आहे. भांडवल पुंजी अधिक प्रमाणात सक्षम होण्यासाठी व व्याजदरात होत असलेली घसरण विचारात घेऊन संचालक मंडळाने लाभांशाची शिफारस १२% दराने केलेली आहे.

विविध प्रकारच्या निधींसाठी विभागणी कशा स्वरुपात केली आहे याचे विस्तृत विवेचन मा. श्री. आघारकर यांनी केले.

सभासद कल्याण निधीचे विश्लेषणही त्यांनी केले. बँकेचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यासाठी महोत्सव निधीची तरतूद बँक करीत आहे. सभासद व समाजासाठी चांगले उपक्रम राबविण्याचा संचालक मंडळाचा मानस आहे असेही सांगितले. लाभाशांसाठी तरतूद ₹ ८,४०,००,०००/- एवढी आहे.

ICAI ने AS - ४ ही तरतूद दि. ०१.०४.२०१७ पासून लागू केली आहे. म्हणून लाभाशांची रक्कम ही देणी या सदरात न दर्शविता नफा-तोटा पत्रकात अंतर्भूत केले आहे.

ठराव मंजूर करण्यापूर्वी काही सभासदांनी प्रश्न उपस्थित केले.

सभासद श्री. भावसार यांनी 'बुडीत व संशयित निधीची' तरतूद ₹ ९.५६ कोटी एवढी का केली? ही तरतूद ₹ ८.५६ कोटी एवढी केली असती तर लाभांश अधिक दराने देत आला असता. मग ही तरतूद ₹ ९.५६ कोटीच का केली?

यास समर्पक उत्तर देताना मा. संचालक श्री. सचिन आंबेकर यांनी सांगितले की, ही तरतूद आवश्यक आहे म्हणून केली आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार जे ताळेबंद, नफा-तोटा पत्रक बनविले जाते. सभासदांना लाभांश देण्याबाबतही रिझर्व्ह बँकेचे निकष आहेत. बँकिंग क्षेत्रातील अनुत्पादित कर्जे आणि आपल्या बँकेतील अनुत्पादित कर्जांचे प्रमाण विचारात घेऊनच 'बुडीत व संशयित निधी' ची तरतूद ₹ ९.५६ कोटी इतकी केली आहे. ही तरतूद जर केली नाही तर त्याचा परिणाम यानंतर मिळणाऱ्या लाभाशांवर होऊ शकतो.

यावर श्री. भावसार यांनी विचारले की, मागील वर्षातील ₹ १३.०० कोटींपैकी फक्त ₹ ८९.०० लाख एवढीच रक्कम वसूल झाली. वसुलीखाते असताना एवढीच वसुली कशी झाली? यावर उत्तर देतांना मा. श्री. आंबेकर यांनी सांगितले की, याबाबतचा विस्तृत तपशील पान क्र. ७३ वर दिलेला आहे. वसुली चालूच असते. ₹ ८९.०० लाखांचे कर्ज निर्लेखित केले आहे. ही वसुलीची रक्कम नाही. ₹ ८९.०० लाख नफा-तोटा खाती दोन्ही बाजूस दिसत आहे.

**ठराव क्र. ४** : सन २०१७-१८ या वर्षात निव्वळ नफा **₹** २०,२९,०९,८६९.०० इतका झाला आहे. संचालक मंडळाने नफा वाटणीस पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे. ती **मा. संचालक श्री. मोहन आघारकर** यांनी सभेसमोर मांडली. सदर नफा वाटणीस ही सभा मंजुरी देत आहे. तसेच धर्मादाय निधीचे वितरण करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

(₹)

| | |
|---|---|
| निव्वळ नफा / Net Profit | २०,२९,०९,८६९.०० |
| + लाभांश मधील जादा तरतूद / + excess Div. Provision | १,६८,१८७.०० |
| मागील शिल्लक / Previous Balance | ७७,८९१.०० |
| गुंतवणूक वध घट निधी (अतिरिक्त) / Investment Fluctuation Fund | ८३,४०,०००.०० |
| इमारत निधी (अतिरिक्त) / Building Fund | ६,५०,००,०००.०० |
| **एकूण / Total** | **२७,६४,९५,९४७.००** |
| **वाटणी** | |
| राखीव निधी २५% / Reserve Fund २५% | ५,०८,००,०००.०० |
| सर्वसाधारण मुक्त निधी १०% / General Free Reserve Fund १०% | २,०३,००,०००.०० |
| राष्ट्रीय सहकार शिक्षण निधी १% / National Co-operative Education fund १% | २०,००,०००.०० |
| लाभांश / Dividend * | --------- |
| धर्मादाय निधी १% / Charity Fund १% | २०,००,०००.०० |
| सभासद कल्याण निधी / Shareholder Welfare Fund | १०,००,०००.०० |
| महोत्सव निधी / Mahotsav Fund | १०,००,०००.०० |
| कर्मचारी सानुग्रह अनुदान / Ex-gratia to Employees | १,८०,०९,३८६.०० |
| निवडणूक निधी / Election Fund | ७,००,०००.०० |
| शैक्षणिक निधी / Education Fund | १०,००,०००.०० |
| बुडीत व संशयित निधी / Bad and Doubtful Fund | ९,५६,००,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक / Balance C/F | ८,४०,८६,५६१.०० |
| **एकूण / Total** | **२७,६४,९५,९४७.००** |

* ICAI ने AS - ४ ही तरतूद दि. ०१ एप्रिल, २०१७ पासून लागू केली आहे. सदर तरतुदीनुसार, 'लाभांश' हा देणी या सदरात आर्थिक पत्रकात दर्शविलेला नाही, याचे कारण लाभांश हा वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासद मंजूर करतात. त्यानुसार बँकेने सन २०१७-१८ च्या आर्थिक पत्रकात 'लाभांश देणे' **₹** ८,४०,००,०००.०० हे देणी या सदरात न दर्शविता, नफा-तोटा पत्रकात अंतर्भूत केले आहे.

सूचक : श्री. प्रभाकर शंकर निकम सभासद क्र. ४६६५७

अनुमोदक : श्री. श्यामजी पी. प्रजापती सभासद क्र. १६६७

ठराव बहुमताने मंजूर.

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक डॉ. रत्नाकर फाटक यांना सांगितले.

**विषय :** **सन २०१८-१९ साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे.**

सन २०१८-१९ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरिता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव **मा. संचालक डॉ. रत्नाकर फाटक** यांनी सभेपुढे मांडला.

श्री. अरुण शिंपी यांनी मुद्दा उपस्थित केला की मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटीज् कायद्याच्या कलम ७६ नुसार वैधानिक लेखापरीक्षकांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित असणे आवश्यक आहे.

यावर उत्तर देतांना मा. डॉ. रत्नाकर फाटक यांनी सांगितले की वैधानिक लेखापरीक्षक सभेस उपस्थित आहेत.

**ठराव क्र. ५** : सन २०१८-१९ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरीता तपासनीसांची नेमणूक करण्याबाबतचा ठराव **मा. संचालक डॉ. रत्नाकर फाटक** यांनी सभेपुढे मांडला. मे. किर्तने अँड पंडीत एल. एल. पी. ही फर्म बँकेच्या पॅनलवरील असून मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटीज् अॅक्टच्या कलम ७२ नुसार सर्व अटी पूर्ण करीत आहे. तसेच ते पुनर्नियुक्तीकरता पात्र आहेत. त्यांचा मेहेनताना शासकीय नियमानुसार संचालक मंडळाने ठरवावा.

मल्टीस्टेट सहकारी कायदा २००२ च्या कलम ७० आणि सध्या लागू असलेल्या इतर तरतुदींनुसार सन २०१८-१९ साठी वैधानिक लेखापरीक्षण करणेकरीता, या वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपासून पुढील वर्षी म्हणजे सन २०१९ मध्ये होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेपर्यंत वैधानिक लेखापरीक्षक म्हणून मे. किर्तने अँड पंडीत एल. एल. पी यांची नेमणूक करण्यास व नियमानुसार त्यांचा मेहेनताना देण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. अशोक दत्तात्रय जांभळे | सभासद क्र. ७०७६ |
| अनुमोदक : | श्री. मकरंद अनंत ताम्हणे | सभासद क्र. २६१०० |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

यानंतर मा. अध्यक्षांनी वैधानिक लेखापरीक्षक मे. किर्तने अँड पंडीत एल्. एल्. पी. चे पार्टनर श्री. अभय जोशी व बँकेचे मुख्य अंतर्गत लेखापरीक्षक श्री. धनंजय गोखले यांची सभासदांना ओळख करुन दिली.

सभासद श्री. मंगेश पाटील यांनी डी. एस्. कुलकर्णींच्या कर्जांची महाराष्ट्रात जी परिस्थिती आहे त्यातून आपली बँक तरुन निघाली त्याबद्दल बँकेचे ज्येष्ठ संचालक व संचालक मंडळाचे अभिनंदन केले. तसेच सभासदांच्या वतीने लेखापरीक्षकांचेही आभार मानले.

बँकिंग क्षेत्र एवढया वाईट परिस्थितीतून जात आहे. तरीदेखिल बँकेने १२% लाभांश जाहीर केला आहे. त्याबद्दल धन्यवाद दिले.

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. हेमंत दरगोडे यांना सांगितले.

**विषय : संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.**

संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे ही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार आहेत व त्याची कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही, असे श्री. दरगोडे यांनी सांगितले.

**ठराव क्र. ६** : संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाबाबतचा ठराव **मा. संचालक श्री. हेमंत दरगोडे** यांनी सभेपुढे मांडला.

संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे ही भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार आहेत व त्यांची कोणत्याही प्रकारची थकबाकी नाही, याची ही सभा नोंद घेत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | माधुरी सारंग | सभासद क्र. ६६१४१ |
| अनुमोदक : | श्री. विवेक व्ही. डेहाडराय | सभासद क्र. २५८३९ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

पुढील ठराव मांडण्यासाठी मा. अध्यक्षांनी मा. संचालक श्री. रमेश गोरे यांना सांगितले.

**विषय : या सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.**

**ठराव क्र. ७** : या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करण्याचा ठराव **मा. संचालक श्री. रमेश गोरे** यांनी सभेपुढे मांडला. अनुपस्थित असलेल्या सर्व सभासदांची अनुपस्थिती ही सभा क्षमापित करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| सूचक : | श्री. गणेश शंकर धानके | सभासद क्र. ५१६८० |
| अनुमोदक : | श्री. विद्याधर सखाराम जाधव | सभासद क्र. ५५५९ |
| | ठराव सर्वानुमते मंजूर. | |

यानंतर सभासद श्री. मुल्हेरकर यांनी डी. एस्. कुलकर्णींच्या कर्जातून बँक बाहेर पडली. त्याबद्दल बँकेचे अभिनंदन केले. फोन क्रमांकावरुन खात्यावरील शिल्लक समजणार आहे, त्याबद्दल IT विभागात काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

यानंतर सभासद श्री. गणेश काळे सभासद क्रमांक १२२ यांनी मुख्य शाखेत रोख भरण्यासाठी गेले असतांना शाखेत खूप गर्दी होती. बराच वेळ रांगेत उभे रहावे लागले. तेथील अधिकाऱ्यांना सांगूनही अतिरिक्त रोखपाल बसविण्यात आला नाही. वरिष्ठ नागरिकांसाठी योग्य विचार व्हावा. तसेच मुदत ठेवींबाबतच्या सेवेबद्दलही नाराजी व्यक्त केली.

यावर उत्तर देतांना मा. अध्यक्षांनी सांगितले की, श्री. काळे यांच्या सूचनांचा बँक योग्य पद्धतीने विचार करेल.

श्री. दीक्षित यांनी प्रश्न विचारण्यास सुरुवात केली असताना मा. अध्यक्षांनी त्यांना प्रश्न विचारण्यास परवानगी नसल्याचे सांगितले. त्यांच्या विरुध्द दाखल केलेला दावा हा न्यायप्रविष्ट असल्याने ते प्रश्न विचारु शकत नाहीत असे सांगितले.

श्री. कुल्लूर यांनी यापुढे वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित रहाणार नसल्याचे सांगितले.

यानंतर श्री. युवराज जाधव यांनी संचालक मंडळाने जी नफा-वाटणी सादर केली त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. शेडयुल्ड बँकेनंतर बँकेस मल्टीस्टेटचा दर्जा प्राप्त झाला. बँकेस जो नफा झाला त्यात संचालक मंडळाचे अथक प्रयत्न दिसत आहेत. या संचालक मंडळाच्या मागे जे रात्रंदिवस मेहनत करीत आहेत. डोळयात तेल घालून चोख व्यवहार ठेवीत असतात त्या बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन. बँक थकित कर्जांसाठी योग्य ती तरतूद करीत आहे म्हणून सभासदांची खाती सुरक्षित आहेत. तसेच, त्यांनी बँकेचे अध्यक्ष मा. ॲड. श्री. सुरेश पटवर्धन व बँकेच्या ४२ शाखांचा कारभार व्यवस्थितरित्या सांभाळणारे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. अतुल खिरवडकर व बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

विषय पत्रिकेवरील सर्व विषय संपल्याने मा. अध्यक्षांनी आभार प्रदर्शन करण्याबाबत बँकेचे उपाध्यक्ष मा. मधुसूदन पाटील यांना सूचित केले.

मा. उपाध्यक्ष श्री. मधुसूदन पाटील यांनी सर्व सभासदांचे आभार मानले. बँकेचे संस्थापक संचालक, माजी संचालक, काही सभासदांनी प्रश्न विचारले व उपयुक्त सूचना दिल्या याबद्दल त्यांचे आभार मानले. डोंबिवली नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष श्री. उदय कर्वे, वैधानिक लेखापरीक्षक किर्तने अँड पंडीत एल्. एल्. पी. चे पार्टनर श्री. अभय जोशी, अंतर्गत लेखापरीक्षक श्री. धनंजय गोखले यांचे आभार मानले. सभेसाठी हॉल उपलब्ध करुन देणारे नवरंग बँक्वेट हॉलचे व्यवस्थापक व सभेचे चित्रीकरण करणारे श्री. श्रीनिवास लेले, ध्वनीव्यवस्थापक यांचे आभार मानले. तसेच पोलीस कर्मचारी, पत्रकार, बँकेचे एक्झिक्युटिव्ह, अधिकारी, कर्मचारी यांना देखील धन्यवाद दिले. यानंतर मा. अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहीर केले.